
★Indexed Journal
★Refereed Journal
★Multidisciplinary Journal
www.allresearchjournal.com

ISSN (Online): 2394-5869
ISSN (Print): 2394-7500
Impact Factor (ISRA): 5.2
Peer Reviewed Journal

# International Journal of Applied Research

Volume 2 Issue 11 Nov 2016 Monthly



Published by:-
Research Journals

# International Journal of Applied Research

(ISSN Online: 2394-5869)
(Print-ISSN: 2394-7500)

Volume- 2 Number- 11 Nov 2016

**Publisher**

**Research Journals**
169, C-11, Sector-3, Rohini, Delhi-110085
Toll Free No.: 18001234070
Mob.: +91-9711224068


Google Scholar

INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER

J-Gate
The Largest E-Journal Database & Gateway

Year: 2016, Volume: 2, Issue: 11
Online ISSN: 2394-5869
Print ISSN: 2394-7500
Online Available at www.allresearchjournal.com

# International Journal of Applied Research

## Index for 2016 (Vol-2, Issue-11) Part D

1. **The war for talent: A key to organizational success**
   **Authored by** GV Chalam
   **Page:** 215-220

2. **Assessment of water quality index of Kathani River, Gadchiroli, Maharashtra, India**
   **Authored by** Rewatkar SB, MIM Siddique and Gourkar AR
   **Page:** 221-224

3. **Post caesarean vesicouterine fistula: A rare entity**
   **Authored by** Dr. Amrita Chaurasia and Dr. Preeti Yadav
   **Page:** 225-228

4. **Sir model of hepatitis B disease in the North Tongu district**
   **Authored by** Joseph Kafui Letsa-Agbozo, Maxwell Seyram Kumah and Daniel Yao Buabasah
   **Page:** 229-234

5. **Determination of gender by intercanine distance of maxilla**
   **Authored by** Dr. Anil Sastya, Dr. Raj Laxmi Sharma, Dr. Mussrat Jehan and Dr. Preeti
   **Page:** 235-237

6. **Importance of assistive technology in teaching for children with learning disabilities in India**
   **Authored by** P Neeraja and K Anuradha
   **Page:** 238-243

7. महात्मा गांधीजींचा भारतीय शिक्षण विषयक दृष्टीकोन
   **Authored by** लोखंडे आर. जे.
   **Page:** 244-248

8. **Bioremediation of chromium by unique chromium reductase activity in *Proteus* sp. isolated from waste water**
   **Authored by** Puja Jhunjhunwala, Rini Roy, Santanu Roy and Aditi Nag Chaudhuri
   **Page:** 249-256

9. **Computational analysis of edge detection operators**
   **Authored by** Bhakti Batra, Saurav Singh, Jyotirmay Sharma and Shaifali M Arora
   **Page:** 257-262

10. **Burden of care in the caregivers of patients with mental illness**
    **Authored by** Dr. Kushagra Varma, Dr. AN Javadekar, Dr. Aneek Saha and Dr. Saurav Kumar
    **Page:** 263-265




ISSN Print: 2394-7500
ISSN Online: 2394-5869
Impact Factor: 5.2
IJAR 2016; 2(11): 244-248
www.allresearchjournal.com
Received: 07-09-2016
Accepted: 08-10-2016

लोखंडे आर. जे.
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
करमाळा जि. सोलापूर

Correspondence
प्रा. लोखंडे आर. जे.
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
करमाळा जि. सोलापूर

# महात्मा गांधीजींचा भारतीय शिक्षण विषयक दृष्टीकोन

**लोखंडे आर. जे.**

**प्रस्तावन**

मोहनदास करमचंद गांधी यांचा शिक्षणासंबंधी दृष्टीकोन क्रांतीकारी, मुलभूत आणि उपयुक्त आहे. तो प्रचलित वर्ण - वर्ग प्रभावित शिक्षणव्यवस्था नष्ट करून व्यक्तीच्या बुध्दी, सृजनशीलता व कल्पनाशक्ती या मानसिक शक्तीचा विकास करण्यात उपयुक्त आहे, ते लोकोपयोगी श्रमाला व प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा आहे. व्यक्ती व समाजाचे चारित्र्य घडविण्यास उपयुक्त असलेला दृष्टीकोन व्यक्तीमध्ये कर्तवनिष्ठा व सेवावृत्ती रूजवण्यात समक्ष आहे. आपल्या समाजाचे वास्तव लक्षात घेवून मांडलेले हे विचार सामाजिक स्थैर्यास आणि सामाजिक धारणेस मार्गदर्शक आहेत, म्हणून त्यांचा शिक्षणांसंबंधी दृष्टीकोन व्यवस्थित व गांभीर्याने समजून घेणे आवश्यक आहे.

म. गांधीर्जीना स्वतः देखील त्याचे शिक्षणासंबंधीचा दृष्टीकोन महत्वाचा वाटतो ते लिहितात, "मैने हिंदुस्थान को आज तक बहुत ज्ञात सी चीजे दी है लेकीन उन सभी चिजो मे यह योजना और पध्दत सबसी बडी चीज है और मै मानता हूँ कि इनमें ज्यादा अच्छी चीजो में देश को नही दे सकूंगा!" सुप्रसिध्द तत्वज्ञ डॉ. राधाकृष्णन त्याच्या दृष्टीकोनाचे महत्व सांगताना लिहितात, देशाच्या इतिहासात अत्यंत आणीबाणीच्या वेळी सुदैवाने आपल्याला गांधींच्या दृष्टीकोनाचा फायदा झाला. त्यामुळे आपण अपेक्षित असलेल्या नवीन भारताची निर्मिती करू शकू. गांधीर्जीच्या दृष्टीकोनामध्ये काही श्रृष्टी असतील. परंतु समग्र वृत्तीने विचार केल्यानंतर ही शिक्षण पध्दती विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व्यक्तीमत्व विकासाला उपयुक्त आहे हे मान्यच करावे लागेल मुलोद्योगी शिक्षण योजना शिक्षण संस्थेला मिळालेली एक मौलिक देणगी आहे. विद्यापीठ आयोगाच्या अहवालात असे नमुद केले आहे की, "With Some details Gandhi's Programmed of basic education we not target. However taking his concept as a how it presents the seeds to a method for the fulfillment and refinement of human per sodality, we wisdom and excellence of which will" become more apparent through the year and will stand the test of time education" सुप्रसिध्द शिक्षण तत्व जॉन डयुई यासंदर्भात लिहितात. मा. गांधीर्जीच्या शिक्षण विषयक दृष्टीकोन इतर सर्व शिक्षण पध्दतीच्या पुढच पाऊल आहे. असे मला खात्री वाटते, तिच्यामध्ये प्रचंड सुप्त सामर्थ्य आहे, या क्रांतीकारक शिक्षण प्रयत्नातून भारतापासून आम्हांला पुष्कळ शिकता येईल अशी मला अशा आहे. जॉन डयुई यांच्या या उदगारापासून म. गांधीजीचे शिक्षण विषयक दृष्टीकोन किती महत्वाचा आहे हे आपल्या लक्षात येते.

म. गांधीर्जीचा शिक्षण विषयक दृष्टीकोन व्यवस्थित मांडलेला नसला तरी त्यामध्ये सुसंगती आहे. त्यांचे विचार गुजराती, हिंदी आणि इंग्रजी भाषेत विखुरलेले आहेत. त्यांनी वेळोवेळी लिहिलेल्या अनेक लेखातून आणि भाषणातून ते प्रकट झालेले प्रयोग आहेत. त्यांनी सत्याचे प्रयोग आत्मकथा, हिंद स्वराज्य, रचनात्मक कार्यक्रम, दक्षिण अफ्रिकेतील सत्याग्रह इत्यादी हे विचार मांडलेले आहेत. त्यांनी फिनिक्स आश्रम (१९०४) टॉलस्टॉप फार्म (१९११), साबरमती आश्रम व गुजरात विद्यापीठ येथे शिक्षणासंबंधी विविध प्रयोग केले. या प्रयोगशाळेतून अनुभवातून त्यांचे शिक्षण विषयक चिंतन आकार देत होते. परंतू त्यांनी विधी येथे सत्याचे प्रयोग केलेल्या शिक्षण परिषदेत स्वतःचे शिक्षणासंबंधी दृष्टीकोन अत्यंत स्पष्ट आणि सुत्रबध्द पध्दतीने मांडले, पुढे ही योजना वधी योजना, जीवन शिक्षण योजना, बेसिक एज्युकेशन, वा मुलोद्योग शिक्षण या विविध नावाने संबोधली जावू लागली या योजनेतून त्याचा शिक्षण विषयक समग्र दृष्टीकोन प्रगट झालेला आहे. निबंधात मांडलेली आहेत. १) देशातील स्त्री पुरूषांना साक्षर करावे २) शारीरीक श्रम शिक्षणाचा अविभाज्य भाग असावा. विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील बहुसंख्य वेळ शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली शारिरीक श्रमामध्ये नावा ३) त्यांना त्यांच्या कला, अभिरूची व परिस्थिती हे लक्षात घेऊन काम करावे ४) त्यांना कामाच्या प्रक्रियेचे संपूर्ण ज्ञान करून देण्यात यावे ५) त्यांना वस्तूचे ज्ञान होवू लागल्यानंतर सामान्य ज्ञान व साहित्याचे ज्ञान द्यावे ६) प्रारंभापासून त्यांना चांगले हस्ताक्षर कसे काढावे ते शिकवावे ७) त्यांना लिहिण्यापूर्वी वाचावयास शिकवावे ८) सर्व प्रकारचे शिक्षण मातृभाषेत द्यावे ९) अध्यापस्थापनासाठी खेळ पध्दतीचा खेळ पध्दतीचा वापर करावा १०) त्याच्या शिक्षणाचा दुसया १६ व्या वर्षानंतर सुरू होतो ११) भावी आयुष्याची तयार करून घेण्यासाठी उद्योगातून शिक्षण घ्यावे १२) त्यांनी जगाचा इतिहास, भूगोल, वनस्पतीशास्त्र व गणित यांचे संपादन करावे. १३) प्रत्येक विद्यार्थ्यांना हिंदी ही राष्ट्रभाषा शिकवावी १४) सोळा वर्षाच्या विद्यार्थीनी पेरणी, स्वयंपाक इत्यादी जीवनोपोगी कौशल्य अवगत करावीत १५) शिक्षण स्वाश्रमी असावे १६) शिक्षकतज्ञ व शिलसंपन्न असावे त्यांच्या सेवावृत्ती असावी १७) चौदा वर्षापर्यंतच्या सर्व मुला - मुलांना मोफत व सक्तीचे करावे १८) शिक्षण संस्थामधूनच कोणत्याही विशिष्ट धर्माचे शिज्ञक्षण देता कामा नये १९) विशिष्ट शिक्षण घेण्याची सक्ती करू नये, त्यांना त्यांच्या

इच्छेप्रमाणे शिक्षणाचे स्वातंत्र्य देण्यात यावे. २०) शिक्षणासाठी भव्य व महागड्या इमारतीची गरज नाही २१) कला महाविद्यालयाच्या शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी समाजाने स्विकारावी २२) शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीला पूरक मूल्यांचे संवर्धन करावे २३) उच्च शिक्षण हे सुशिक्षिततांना मिळालेले विरोधी संधी असते म्हणून त्यांनी समाजचे मानले पाहिजे.

### शिक्षणाचा अर्थ

म. गांधीजी शिक्षणाचा व्यापक अर्थ सांगितलेला आहे. त्यांच्या मते साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे, साक्षरता ही शिक्षणाची सुरूवात देखील नाही. साक्षरता शिक्षणाचे साधन आहे ते साध्य नाही. शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांचे शरीर, मन आणि आत्मा यात जे सर्वोकृष्ट आहे त्याचा विकास करणे होय ते लिहितात. "By education, I mean an all-round drawing act the best in child mind and sprite literay is not the end o education nor even the being literary in itself is no education" याचा अर्थ गांधीजी म्हणजे विद्यार्थ्यांतील सर्व सामर्थ्यांचा व क्षमताचा विकास करणे होय. म. गांधीजी शिक्षणातुन विद्यार्थ्यांना केवळ बौध्दीक नव्हे तर शारीरिक, भावनात्मक, नैतिक आणि क्रियात्मक विकास करणे अपेक्षित होते म्हणून ते म्हणतात. True education is that which draws out and stimulates the spiritual intellectual and physical faculties of children'

I hold that true education of intellect can only come through proper exercise and training of the body organ e. g hands eyes errs nose etc. in other words on intelligent use of organs in a child provides the best and quest way developing his intellect bot unless the development of the mind goes hand in hand with the corresponding awakening of the of the sol the former alone would prove to be a poor posed affair. By spiritual training. I main education of hart proper and on all round development of the and therefore can take place only when it proceeds part passes with education of physical and spiritual facilities of the child. They constitute and indivisible whole"

त्यांच्या या विचारातून शिक्षणाचा आणखी एक अर्थ ध्वनीत होतो. विद्यार्थींचे डोके म्हणजे रिकामे डोके नव्हे की जे हवेत त्यात कोंबावे किंवा विद्यार्थी म्हणजे मातीचा गोळा रिकामे नव्हे की, त्याला हवा तो आकार द्यावा विद्यार्थी जेव्हा जन्माला येतो तेव्हा सहज प्रवृत्ती घेवून येतो यामुळे त्याच्या मते शिक्षण म्हणजे जीवनातील उच्च मुल्ये, संपादन करण्याचे साधन होय. म्हणून त्यांनी शिक्षणात साक्षरता किंवा विविध शास्त्राच्या ज्ञानापेक्षा विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व पुरस्कार केला त्यांच्या मते शिक्षण म्हणजे उमचा (हात डोके व हृदय) विकास करणे होय.

### शिक्षणांची उद्दिष्ट्ये :

म. गांधीजी कोणत्याही प्रश्नाचा सर्वांगिण संकलित पध्दतीने विचार करतात. त्यांनी शिक्षणाची उद्दिष्ट्ये समग्र रितीने व संतुलित स्वरूपात मांडलेली आहेत. शिक्षणाची उद्दिष्टये व्यक्तीनिष्ठ असावीत की समाजनिष्ठ? त्यांच्या मते ही दोन्ही उद्दिष्टये परस्पर पूरक आहेत. व्यक्ती हाच शिक्षणाचा केंद्र बिंदू असला पाहिजे. परंतु व्यक्ती ते देखील हे लक्षात घेतले पाहिजे की तिचा विकास समाजामुळे होतो. तिच्या जीवनाची सफलता सामाजिक सेवेतच असते. उपनिषदातील या विद्या विमुक्तने या श्लोकात शिक्षणाचे उद्दिष्ट्ये त्यांना मान्य होते. या श्लोकाचा खरा अर्थ सांगतात ते म्हणतात, विद्या म्हणजे केवळ अध्यात्मिक ज्ञान व मुक्तीचा अर्थ आहे. या जीवनातील सर्व प्रकारचा गुलामगिरीतून सुटका करून होते. गुलामगिरी म्हणजे दुसऱ्याच्या स्वाधीन असणे आणि आपण निर्माण केलेल्या कृत्रिम गरजाचे गुलाब बनणे या प्रकारची त्यापासे मुक्ती मिळते तेच खरे शिक्षण होय. यावरून त्यांना अभिप्रेत असलेल्या शिक्षणांच्या उद्दिष्टांची कल्पना येते.

### चारित्र्याची बांधणी:

म. गांधीजींच्या मते शिक्षणाचे उद्दिष्ट्ये विद्यार्थ्यांच्या चारित्र्याची बांधणी करणे हे आहे. शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या चारित्र्यावर जडण - घडण झाली पाहिजे. त्याच्या चरित्र्याचे समर्थन झाले पाहिजे. म्हणून गांधी स्वतः म्हणतात निती शिक्षणावर भर दिल्याशिवाय आपल्या सुटका नाही, निती शिक्षण देणे अपघड गोष्ट नाही या साठी आपल्याला पाश्चात्य सभ्यता नाकारावी लागेल. चारित्र्य घडवणारी शिक्षणखरे शिक्षण असते असे त्यांचे ठाम मत आहे. कोलोबा येथील या महाविद्यालयात विद्यार्थ्यांसमोर बोलताना ते म्हणतात शिक्षणाला शुध्द चारित्र्याची खेटक नसेल तर त्या शिक्षणाची किमत शुन्य आहे त्या शिक्षणाला सत्यनिष्ठेचा आणि समान शुध्दतेचा भर भक्कम आधार नसेल तर ते कुचकामी ठरेल. आपल्या जीवनातील व्यक्तीगत शुध्दता, पावित्र याकडे तुकचे लक्ष नसेल तर तुमच्या नाश होईल. याच संदर्भात ते लिहितात. "The end of all knowledge must be building up character" यावरून हे स्पष्ट होते की ते शिक्षणात विद्यार्थ्यांच्या चारित्र्य सवर्धनला सर्वांत जास्त महत्वाचे स्नान देतात.

म. गांधीजींच्या मते शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये विवेकशील विकसित झाली. त्या शुभ -अशुभम योग्य आयोग चांगले वाईट यात मत भेद करता आला पाहिजे. विवेक न शिकणारे शिक्षण खरे शिक्षण नसते. म्हणून त्यांनी असे प्रतिपादन केलेले आहे की, "An education which does not teach us to discriminate between good and bad, to assimilate the one and to mesh we the other is a misnomer आपण मानव विचार करणारे प्राणी आहोत, शिक्षणाच्या काळात सत्य कोणते? असत्य कोणते? कटू भाषण कोणते? मृदू भाषण कोणते? शुध्द वस्तु कोणती? अशुध्द वस्तु कोणती यात विवेक करायला शिकला पाहिजे तरच यांच्या मते शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये सत्य, अहिंसा, सयंम सहनशीलता त्याग समता, स्वातंत्र, न्याय आदि मुल्ये आणि सदगुणाचे सहकार्य केले पाहिजेत. त्याशिवाय शिक्षणातून चांगला माणूस व लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक असणारा जबाबदार नागरिक आपल्याला घडविता येणार नाही. शिक्षणाचा हेतू आदर्श नागरिकांला आवश्यक असलेला विशाल दृष्टीकोन, सहिष्णुता बंधुत्व व राष्ट्राचे कल्याण हे परस्पर पूरक आहेत, हे विद्यार्थ्यांना समजवून सांगितले पाहिजे हा विचार स्पष्ट करताना ते म्हणतात. "A nation can no advance without the units of which it is composed advancing and conversely. No individual can advance without the nation of which it is a part also advancing. म. गांधींनी अत्यंत दृष्टपणाने हे ओळखले होते. की देश स्वातंत्र झाल्यावर देशातील तरूण पिढीला सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनातील योग्य मुल्याचे ज्ञान करून दिले पाहिजे, त्याच्यात योग्य कल आणि कौशल्याचा विकास केला पाहिजे डॉ.झाकीर हुसेन कमिटीनेदेखील आदर्श नागरिक घडविणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन केले आहे, ही कल्पना कमओने पुढील काळात मोडली आहे.

"The new generation must at least have an opportunity of understanding its own problem and rights and obligations a completely new system is necessary to secure the minimum of education of intelligent exercise of the rights and duties of citizens. Secondly in modern times that intelligent citizen must be active member of society able to repay in the from of some useful service what he owes to it as member of an organized civilized community. An education which produces drags and Parasites. म. गांधीच्या मते शिक्षणाचे अंतिम ध्येय शीप संपन्न विवेकी आणि जाबाबदार नागरिक तयरा करणे हेच तयार असते. परंतु त्यासाठी शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांच्या विचारात शब्दात आणि कृतीत शुध्दता काशी राहिल याकडे लक्ष दिले पाहिजे.

### आत्मनिर्भयता:

म. गांधींच्या दृष्टीकोनातून शिक्षणाने विद्यार्थ्यांमध्ये आत्मनिर्भयता निर्माण झाली पाहिजे विद्यार्थी आणि शिक्षण संख्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्या पाहिजेत. गांधींच्या समोर देशातील साडेसात लाख खेड्यातील दारिद्र्य आणि बेकारी कशी संपवता येईल? लोकांच्या मुलभूत गरजा कशा पूर्ण करता येतील? ग्रामीण जीवन कसे बदलता येईल असे प्रश्न होते. शिक्षणाने हे प्रश्न सोडवण्यास मदत केली पाहिजे. म्हणून त्यांनी पुस्तक केंद्रीत शिक्षणाऐवजी हस्तउद्योग केंद्रीत शिक्षणाचा पुरस्कार केला त्यांनी बडोदा संस्थानांती प्राथमिक शिक्षणाचे मुल्यमापन करताना अशी प्रतिक्रिया दिली की, या शिक्षणाने लोकांच्या गरजा पूर्ण होतात काय? कायदा या शिक्षणाने भौतिक व नैतिक विकास झाला आहे काय? त्यांनी असे मुलभूत प्रश्न उपस्थित करून असा प्रश्न विचारला की, जे शिक्षण जगण्यासाठी कसा निरूपयोगी ते शिक्षण काय

कामाचे? शिक्षणातून विद्यार्थीचे आणि समाजाचे प्रश्न सुटले पाहिजेत म्हणून त्यांनी शिक्षणात श्रम व उत्पादकता यावर अधिक भर दिलेला आहे. शिक्षणात त्या परिसराच्या भौतिक व सामाजिक गरजांचे प्रतिबिंब उमटले पाहिजे म्हणून त्यांनी अग्रहपूर्वक हस्तव्यवसायातून शिक्षण या कल्पनेचा आग्रह धरला, त्यांच्यामते हस्तव्यवसायातून शिक्षण झाल्याशिवाय व्यक्ती व समाज आर्थिकदृष्टीकोन आत्मनिर्भय होणार नाहीत व शिक्षण स्वाश्रमी बनणार आहे.

त्याच्यामते हस्तव्यवसायातून शिक्षण दिल्यास अनेक लाभ होतात विद्यार्थ्यांना अर्थाजन करताना शिक्षण घेताना अर्थाजन करताना शिक्षण घेताना अर्जाजन करणे शक्य होते. विद्यार्थी स्वतःच्या शिक्षणाचा खर्च स्वतः भागवू शकतात, शिक्षण संस्थांनी देखील निधी उपलब्ध होऊ शकतो. शासनावर शिक्षण संस्थांना आनुदान देण्याचा भर पडत नाही. विद्यार्थ्यांना मिळणारे ज्ञान पुस्तकातून मिळणाया ज्ञानापेक्षा अधिक असते. खरे उपयुक्त व मौलिक असते, यातून प्रशिक्षित झालेले विद्यार्थी त्याच्या भावी आयुष्यातील प्रश्न आणि अडचणीवर समर्थपणे मात करू शकतात. ब्रिटिशांनी ग्रामीण अर्थव्यवस्था उध्दवस्त केली. ग्रामीण लोकांचे व्यवसाय नष्ट झाले. त्याच्यात दारिद्र्य व बेकारी वाढली यावर मात करण्यासाठी ग्रामीण आर्थिक जीवनाचे पुर्नजीवन करणे आवश्यक अहे. असा त्याचा विश्वास होता. यापध्दतीमुळे निष्क्रीय विद्यार्थी सक्रिय बनतात आणि मानसिक शक्तीचा विकास होतो व शिक्षणातील बोध्दीक व तात्वीक क्षमता कमी होते. ते शारिरीकदृष्ट्या सुदृढ बनतात.

त्याच्यात शारिरीक श्रम करण्याची प्रवृत्ती व सवय विकसित होते. यामुळे श्रमाला महत्व व प्रतिष्ठा प्राप्त होते. विद्यार्थीच्या हाताला काम मिळाल्यामुळे बेकारीचा प्रश्न सुटतो. विद्यार्थी स्वालंबन निर्माण होते. त्यांना त्याच्या शिक्षणाचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध जोडता येतो. यामुळे ज्ञान शक्ती व श्रमशस्ती यामध्ये समन्वय साधता येतो याचा परिणाम सत्तागत निर्माण झालेले बुध्दीजीवन वर्ग जातील भेद नष्ट होते. म्हणून गांधी लिहितात "Labour is source of all wealth. All higher casts give in the exploitation of lower cats wealth is inevitagly reduced and large scale poverty occasioned" म्हणून या सर्व प्रश्नावर मात करण्यासाठी हस्त व्यवसायातून शिक्षण उपयुक्त ठरते फक्त व्यवसाय निवडताना मात्र माळजी घेतली पाहिजे. निवडलेल्या व्यवसाय हा व्यातिक गरजासाठी निगडीत असावा तो साधा व कमी वार्चिक असावा त्यातून विद्यार्थ्यांच्या विकासाला मदत व्हावी तो व्यवसाय अभिरूची, बौध्दीक क्षमता आणि कल घेवून दिला जावा. हा व्यवसाय उत्पादक व लोकोपयोगी आसावा काळजीपूर्वक व कल्कतेने व्यवसायातून शिक्षण दिल्यास व्यक्ती व समाज आर्थीक दृष्ट्या स्वालंबी बनू शकतात असा गांधीर्जीचा विश्वास होता या संदर्भात Educatoin Reconstructon, Hindustani Taxini sangh Wardha Labour is source of all wealth. All higher casts on the expolistatoin of lower casts wealth is inevitably reduced and large scale poverty occasioned.

### समाजसेवा

म. गांधीर्जीच्या मते शिक्षणाचे उद्दिष्ट्ये समाज उपयोगी विद्यार्थी निर्माण करणे हे असले पाहिजे ते शिक्षणाकडे सामाजिक क्रांतीचे साधन म्हणून पाहतात, त्याच्यामते शिक्षणातून सामाजिक विकास व सामाजिक परिवर्तन झाले पाहिजे ते लिहितात. My plan to impart primary education through to medium to village handi crti is conceived as spearched of a silenet social revolulation fraought with the most far reaching con ceseyences it would provide healt hand moral basisc of relationship between city and the village and thus go along way towards eradicateing some of the worst evils of the present social in sercurity and posiered relationship between the class and all his would be accompolished without the horros of a blood class war or clase capatil expenditve such as would be involoved in the mechanization of a vast contenet alike india nod. would it entail a helpless dependce of foreign imported machinery or technical skill clastly by obviating the necessaity for highly specialized falent it would palace the disting of the masses as it where lace the disting of the own hands. हा दृष्टीकोन शिक्षणातून समाज सेवाप्रवृत्ती विद्यार्थीच्या जागी निर्माण झाली पाहिजे.

### अभ्यासक्रमः

अभ्यासक्रम शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करीत असताना प्रभावी साधन असते याची म. गांधींना कल्पना होती. त्याच्या मते अभ्यासक्रम हा जीवन केंद्रीत आसावा तो विद्यार्थ्यांना भौतिक सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक वातावरणाशी समयोजन करण्यास उपयोगी पाडावा तो सर्वांगीण विकास आणि आर्थिक स्वावलंबन या दोन तत्वाचा केंद्र मानून तयार करावा. तो उद्योग क्रिया वा उत्पादकता याला चालना देणारा असावा बदलत्या गरजा व प्रश्न याचा विचार करण्यात इतपत तो लवचिक असावा.

म. गांधींनी अभ्यासक्रमाता कोणकोणत्या विषयाचा समावेश करावा ते सांगितले आहे. विशेषतः शेती, सुतकताई, विणकाम, सुतारकाम, धातूकाम, बांधकाम आदी हस्तउद्योगाचा समावेश असावा बदलत्या परिस्थिती प्रमाणे नवीन व्यवसायाचा मध्ये समावेश केला जातो. अभ्यासक्रमात संवाद कौशल्य विकसित करण्यासाठी लेखन, वाचन व साहित्याचा अस्वाद घेण्यासाठी मातृभाषेचा समावेश करावा. दैनंदिन आर्थिक व्यवहार कुशलतेने समावेश आसावा विद्यार्थ्यांना निसर्गाचे ज्ञान व्हावे व त्याच्यात रसायनशास्त्र आदि नैसर्गिक शास्त्राचा समावेश असावा त्याचे शरीर निरोगी व सुदृढ राहण्यासाठी त्यांना शारिरीक शिक्षण देण्यात यावे विद्यार्थ्यांना समाजाचे ज्ञान व्हावे व त्याचा सामाजिक जाणीवा प्रगल्भ व्हाव्यात, म्हणून इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र आदि सामाजिक शास्त्राचा समावेश करण्यात यावा. त्याच अभिरूचीचा दृष्ठ वळण देण्यासाठी व सौदर्य दृष्ठी वाटण्यासाठी साहित्य, चित्र रंगीत आणि कलाचा अभ्यासक्रमात समावेश आसावा.

डॉ. एम. एस. पटेल यांनी अत्यंत नेमकेपणाने म. गांधीजींच्या अभ्यासक्रमासंबंधीचा दृष्टीकोन मांडलेला आहे. "It is naturalistc in its setting idealistic in its aim and pragmatic in its method and programme of Work. To emphas4e one aspect of hs philosophy to neglect of there is to see a part and indentiy inti wills the whole"

### शिक्षणाचे माध्यमः

म. गार्धीनी शिक्षणाचे माध्यम कोणते असावे? अध्ययन अध्यापन कोणत्या पध्दतीने करावे? या प्रशनांसंबंधी व्यवहारिक विचार मांडले आहेत. त्याच्यामध्ये संपूर्ण शिक्षण मातृभाषेतून द्यावे ते इंग्रजीच्या माध्यम शिक्षण देण्याच्या विरोधात होते. इंग्रजीतून शिक्षण देणे म्हणजे विद्यार्थ्यांचा नैसर्गिक विकास खुटविणे व त्याची नवनिर्माण क्षमता मारणे होय. म्हणून ते लिहितात. "To inflict English on children is to stunt their nature growth and perhaps to kill originality in them" इंग्रजी माध्यमाचा आग्रह धरणे गुलामगिरीचे जनत करणे होय मातृभाषा ही समान संस्कृती व समृध्द संस्कृती निर्माण करण्यास लाभदायक असते. भाषेच्या माध्यमातून त्यांना देश एकसंघ ठेवायाचा होतो. हिंदूस्थानी ही राष्ट्रभाषा आसावी या आग्रहामध्ये मागे त्याचा हिंदू-मुस्लीम ऐक्य निर्माण करणे हा हेतू होता. त्यांच्यामते व्यवहारिक दृष्टीकोनातून विचार केल्यास मातृभाषा हीच अध्ययन आणि अध्यापनासाठी उपयुक्त असते म्हणून ते लिहितात. "I Must cling to my mother tongue as to my mothers breast in spite its short comings it alone can give me the a life giving milk"

### अध्यापन पध्दतीः

म. गांधीनी सांगितलेल्या अध्यापन पध्दती त्याच्या नई तालिम या योजनेतून निर्गमित केल्या आहेत. त्या जान ड्युईच्या या तत्वावर आधारलेल्या आहेत. त्याच्या मते हस्तव्यवसाय पध्दती ही अध्ययन व अध्यापनासाठी उपयुक्त असते म्हणून ते विद्यार्थ्यांना हस्तव्यवसायातून शिक्षण द्यावे असे सांगतात. प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून अध्यापन केल्यास ते परिणामकारक ठरते. म्हणून ते म्हणतात खरे बौध्दिक शिक्षण हे शरीराच्या हात पाय डोळे व नाक इ. योग्य वापरातून होंवू शकते. म्हणून त्यांनी अध्ययन व अध्यापनासाठी समन्वय प्रकल्प पध्दती यांचा पुरस्कार केला आहे. त्याच्या मते निरनिराळ्या विषयातील ज्ञानामध्ये आणि ज्ञान व जीवन यामध्ये समन्वय असला पाहिजे विषयाचे पृथक ज्ञान देण्याऐवजी एकसंघ पध्दतीने दिले पाहिजे. यातून विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या एकात्मतेचा अनुभव येवू शकतो. सर्व ज्ञान एकाच आहे, यातूनच अभ्यास करून देण्यात यावा. त्याचप्रमाणे त्यांना शिकवलेल्या विषयातील ज्ञानाचा संबंध प्रत्यक्ष जीवनाशी आणि इतर विषयाशी कसा आहे ते शिकविले पाहिजे. त्यामुळे समन्वय पध्दती व प्रकल्प पध्दती लाभदायक असते, कारण प्रत्यक्ष अनुभव घेणे

हा या पध्दतीत मुख्य आधार आहे. विद्यार्थी जितके अधिक अनुभव घेतील तितके ज्ञान व्यापक व खोल होईल, अनुभवातून शिक्षण द्यावे, हे तत्त्व त्यांच्या पध्दतीमागे आहे. परंतू दिला जाणारा अनुभव मात्र जीव तो मुख्य असावा असा आग्रह होता.

**शिक्षण:**
म. गांधींनी बालक केंद्रीत शिक्षण पध्दतीचा पुरस्कार केला आहे. परंतु त्यांनी शिक्षणात शिक्षकाला देखील महत्वाचे व प्रतिष्ठेचा स्थान दिले आहे. शिक्षकाचे मुख्य कार्य विद्यार्थ्यांच्या सर्व क्षमता व शक्तीचा विकास करणे व त्यांच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगिन विकासाकडे लक्ष देणे हे असते. शिक्षकांना केवळ पुस्तकी ज्ञान देण्याचे व विद्यार्थ्यांच्या डोळ्यात माहिती कोंबण्याचे काम करू नये. त्यांनी त्यांच्या व्यक्तीमत्वाला उचित आकार दिला पाहिजे. शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रेरणा प्रेरक बनला पाहिजे. त्यांनी विद्यार्थ्यांना विवेकी बनविले पाहिजे. शिक्षकांनी आपला संपूर्ण विषय तयारीनिशी शिकविली पाहिजे. शिक्षण संस्थेत किंमती उपकरणे, साळित्य व टोलेजंग इमारती यापैकी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शैक्षणिक, बौध्दिक आणि सांस्कृतिक असे अनुकूल वातावरण तयार केले पाहिजे. शिक्षकांनी अशा प्रकारचे वातावरण तयार केले पाहिजे. शिक्षकांनी अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविले पाहिजेत व संबंधीत सर्व घटकांना सर्व घटकांना योग्य मार्गदर्शन केले पाहिजे. त्यांच्यामते शिक्षक आणि त्याचे जीवन हेच खरे विद्यार्थ्यांचे क्रमिक पुस्तक आहे. त्याचे चारित्र्य निष्कलंकित असले पाहिजे. चारित्र्य संपन्न शिक्षकच चारित्र्य संपन्न विद्यार्थी घडवू शकतो. त्याच्यामते शिक्षक त्यागी, सहिष्णू वृत्तीचा आसावा त्याच्यात सहयता असावी तो ध्येयवादी आसावा त्यांनी शिक्षणाकडे स्वच्छ दृष्टीने पाहिले पाहिजे त्यांच्या मनात कोताही व्यक्ती व विचारसरणी यांच्या विषयी पूर्वगृह आसता कामा नये त्यांनी स्वतःच्या कृतीत विद्यार्थ्यासमोर आदर्श ठेवला पाहिजे. त्यांनी विद्यार्थी सोबत काम केल्यास त्या विद्यार्थ्यावर अनुकूल परिणाम होतो. शिक्षकांनी आपली भूमिका परिणामकारिरित्या पार पाडण्यासाठी स्वतःच्या कामाचे व्यवस्थित नियोजन करावे, विद्यार्थ्यांना त्यांच्या विविध कामात योग्य मार्गदर्शन करावे. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या त्रृष्टी न रागवता सहजरित्या त्यांना दाखवून दिल्या पाहिजेत. तरच तो विद्यार्थीना खरा मित्र मार्गदर्शक व तत्वज्ञ होवू शकतो.

**विद्यार्थी:**
म. गांधी विद्यार्थी केंद्रीत शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. विद्यार्थी हा देशाचा भविष्याचा मुख्य आधार असतो. अशी भूमिका त्याची विद्यार्थीशी सतत संपर्क व संवाद होता. विद्यार्थीही त्यांना अडचणी आणि प्रश्न मनमोकळ्यापणाने सांगत असत. म. गांधी कार्य बहुल्यातून वेळ काढून त्यांना विविधि भाषणातून व हरिजन व जग इंडिया लेख लिहून मार्गदर्शन करती असत. त्यांचे असे मत होते की, विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय स्वातंत्र चळवळीत फार लाभ झालेला आहे. म्हणून कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांकडे लक्ष दिले पाहिजे.
म. गांधींजींनी विद्यार्थीतील अनेक उणिवा देखील दाखवून दिल्या आहेत. त्याच्यामते आज विद्यार्थ्यांमध्ये समाजविषयी अनज्ञस्थ्जा वाटून आहे. त्यांना अहिंसेपेक्षा हिंसक हा विचार आर्कषित करीत आहे. त्यांच्या प्रचलित निरर्थक व अस्वाभाविक शिक्षणावद्दल दिवसे – दिवस आकर्षण वाटत आहे. त्यांना ही शिक्षण पध्दती प्रतिष्ठीत जीवन उचित साधने वाटते. म्हणून ते मातृभाषेच्या अभ्यासाची उपेक्षा करून परकीय शिक्षण व्यवस्थेकडे वळत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये विविध उणिवा असल्या तरी विद्यार्थी मुळात चांगले असतात असे मत होते. अविचारामुळे त्यांच्यात दोष निर्माण झालेले आहे. यामुळे समाजाचे व राष्ट्राचे फार मोठे नुकसान होत आहे. ते सर्व त्यांना समजावून सांगितले पाहिजे त्यांचा विद्यार्थ्यांवर विश्वास होता. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड शक्ती असते. हे नेमकेपणाने ओळखले होता. त्यांनी विद्यार्थीमध्ये देशाचे भवितव्य आवलंबून असते. म्हणून ते लिहितात, विद्यार्थ्यांना आळणी भारतीय जीवनात स्वाद उत्पन्न करण्यासाठी भूमिका घ्यावी लागेल. मिठाची खारटपणाचा त्याग केला तर मग व्हायचे कसे ? विद्यार्थीनी भूमिका पार पाडण्यासाठी त्यांनी कसे वागावे व काय करावे या विषयी आचारसंहिता सांगितलेली आहे. विद्यार्थीनी स्वतःचे ज्ञान वाढवावे. त्यांच्या विचार आणि आचार शुध्दता व विन्रमता आसावी. त्यांनी स्वयं नियंत्रण या तत्वाचा वापपर करून वागावे त्याचे विचार व आजार पवित्र असेल पाहिजेत. त्यांनी विद्यार्थीनी शुध्द व सभ्यवर्तन ठेवले पाहिजे. त्यांनी स्वतः तर राष्ट्रीय भाषा शिकली पाहिजे व इतरांनाही शिकविली पाहिजे. विद्यार्थीनी नवीन सिध्दांत व विचार यांचे मातृभाषेत भाषांतर केले पाहिजे. त्यांनी कोणत्याही पक्षीय राजकारणात सहभागी होवू नये. त्यांनी राष्ट्रीय कार्यासाठी मात्र कार्य करावे. स्वतः राष्ट्रगीत व वंदेमातरम गीत गावे ध्वजांकित गुंड्या व बिलचे लावायेत समाजातील जातीयता व अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न करावा. समाजात वेळ प्रसंगी उद्‌भवनाणाया जातीय दगली स्वतः जाणीव थोडक्यात घालून थांबवण्याचा प्रयत्न करावा. वैद्यकीय सेवा, रूग्णांची सेवा अथवा परिश्रम करावेत. या संदर्भात लिहितात, आपले सर्व ज्ञान व पाडित्य एका पारड्यात ठेवा आणि दुसऱ्या पारड्यात सत्यनिष्ठा आणि पावित्र्य ठेवून रहा पाडित्याचे पारडे अस्मात टेकल्याचे आढळून येईल, म्हणून गांधीजींनी विद्यार्थ्यांना सत्यवादी व परित्र जीवन जागा असा सल्ला दिला आहे.

**प्रासंगिकता:**
म. गांधीजीचा शिक्षण विषयक दृष्टीकोन त्या कालखंडात व यास संपूर्ण मानव जातीस वरदान ठरलेला आहे. मानवतावाद हा दृष्टीकोनाचा आधार आहे, प्रेमाचे तत्व व एकोप्याचे तत्व या दोन तत्वाच्या आधाराने या दृष्टीकोनाची मांडणी करण्यात आली आहे. व्यक्तीच्या मुलभूत गरजा पूर्ण करणे व त्यातून समाज व राष्ट्राचे पुनरूस्थान करणे हा या मागचा प्रामाणिक हेतू आहे. म्हणून त्याचा दृष्टीकोन स्वप्न रंजनवादी किंवा प्रगती विरोधक व निरूपयोगी नाही. याउलट त्याचे विचार व्यक्ती व समाजजीवनाला उचित दिशा देणारे व अत्यंत व्यवहारिक आहेत. या विचारात आव्हाने पेलण्याची क्षमता आहे. देशातील दारिद्र्य, बेकारी व अज्ञान ही आपल्या समोरील प्रमुख आव्हाने आहेत. म. गांधीजींचा विचाराची प्रमाणिकपणे व गांभीर्याने अंमलवजावणी केल्यास आपणास दारिद्र्य त्याचा निश्चितपणे बेकारी आणि अज्ञान ही कमी करण्यास उपयोग होईल, समाजात दिवसे दिवस आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विषमता वाढत आहे. यामधील अनेक कारणापैकी अज्ञान हे एक कारण आहे. याचे हे एक कारण आहे. यासाठी म. गांधींनी प्रौढ शिक्षण व महिलांचे व दलिताचे शिक्षण यासाठी आग्रह धरलेला होता. कारण त्यांच्या मते लोकांना जाणीव टोकदार झाल्याशिवाय कोणत्याही प्रकारच्या चळवळी यशस्वी होत नाहीत. त्यांना शिक्षणाचा उपयोग सामाजिक व राजकीय चळवळीत यशस्वी होत नाहीत. आजच्या चळवळीत ते त्यांची हीमदृष्ठी समजून चळवळी केल्यास यशस्वी होतील, आज जात धर्म, वेश, भाषा आदि संकुचित विचार व भावना यांच्या आधारे समाजाचे विघटन टाकण्यासाठी सामाजिक आणि राजकीय ऐक्य टिकविणे गरजेचे आहे. राष्ट्रातील व सर्व राज्यातील लोकांना परस्परांचे विचार व भावना घेता याव्यात म्हणून त्यांनी शिक्षणात विद्यार्थ्यांना राष्ट्रभाष्ना शिकवण्याचा आग्रह धरलेला होता. जो राष्ट्रीय व सामाजिक ऐक्य प्रस्थापचनेसाठी उपयुक्त ठरणार आहे.
प्रत्यक्ष कृती व अनुभवातून शिक्षण ही त्यांची कल्पना व्यक्ती व समाजाला उपयुक्त आहे. आज विविध शाखातील तरूणांना त्याच्या विषयातील ज्ञान प्रत्यक्ष जीवनातील व्यवहार करताना प्रश्न सोडविताना वापरता येत नाही. मेकॅनिकल इंजिनिअर स्वतःचे स्कूटर दुरूस्ती करू शकत नाही किंवा वाणिज्य, शाखेचा विद्यार्थी हिशोबबोच ठेवू शकत नाही किंवा समजिक शास्त्राचा विद्यार्थी सामाजिक घटनाचा अचूक अन्वयार्थ लावू शकत नाही याचे मुख्य कारण अनुभवाचा अभाव, देशातील लोकांचे दारिद्र्य अज्ञान आणि शासनाची शिक्षणावर खर्च करण्याची क्षमता लक्षात घेता. म. गांधींनी सांगितलेल्या मार्गाने वाटचाल केल्यास शिक्षणाचे देशव्यापी सावत्रीकरण सक्तीचे शिक्षण करणे सहज शक्य होइरल, शिक्षणसंस्था स्वावलंबी बनतील. आज देशात सर्वत्र जातियवाद, सामाजिक व धार्मिक दंगली हिंसाचार, दशहवाद, मुलतात्ववाद, अमानुपकता, भ्रष्टाचार, काळानुसार फसवेगिरी व्यसनधीनता दिवसे दिवसे वाढत आहे. हे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी सांगितलेल्या अंहिसात्ममक शिक्षण व शिक्षणातून विवेकी, शीलसंपन्न ज्ञानी, तज्ञ व्यक्ती निर्माण होत आहेत. आज बुधीजीवी आणि श्रीमंत वर्ग समाजातील दुर्बल व मागासवर्गीय लोकांकडे संपूर्णता दुर्लक्ष करून स्वतःचे आणि फक्त स्वतःचे हित जपून जीवन जगत आहेत. त्याच्यातील ही वाढती व्यक्ती केंद्रीता घातक आहे. परंतू शिक्षणातून जबाबदार नागरीक व सेवावृत्तीचे नागरीक निर्माण करावे. म. गांधींच्या विचाराचा उपयोग केल्यास आपल्याला बुध्दीजीवी वर्गाला त्याच्या व्यक्ती केंद्रीकरणातून कारता येईल.
आज शिक्षणात कार्यान्वीत असलेल्या समाज सेवा, कार्यानुभव, राष्ट्रीय सेवा योजना प्रौढ शिक्षण, शिक्षणाचे व्यावसायीकरण, कृपीपूरक उद्योग आदि उपक्रमाचे उगमस्थान म. गांधींचे शिक्षणविषयक दृष्टीकोन आहे. परंतु दुर्देवाने

या उपक्रमात गांधीजींच्या दृष्टीकोनांचा आत्मा हरवलेला आहे. यामुळे यांना एका प्रकारच्या कर्मकांडाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. असे घडण्याला अनेक कारण कारणीभूत आहेत. एकतर देशातील राज्यकर्ते, शिक्षणतज्ञ, प्रशासक आणि शिक्षक गांधी विषयक श्रध्दा व्यक्त करताना पणत्याचे विचार व दृष्टीकोनावर श्रध्दा नाही. त्यांना त्यांचा दृष्टीकोन नीट समजेल नाही, यामुळे त्यांच्या विचारासंबधी वरवरचा विचार करतात. म्हणून आज आपल्या शिक्षणात त्यांच्या शैक्षणिक दृष्टीकोनाची निष्ठापूर्वक व प्रामाणिकपणे अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची:**


1. हिन्द स्वराज्य पृ. १३०
2. हरिजन, सप्टेंबर पृ. ११, १९३७
3. उपरोक्त
4. हरिजन, सप्टेंबर २९/०३/१९३१
5. यंग इंडिया, २१/०१/१९१६
6. हरिजन ऑक्टोबर १९३७
7. यंग इंडिया १४/११/१९२७
8. Patel MS. the Education Philosophy of Gandhi. 179.